# क

# कवितेचा

**शिक्षण विभाग**

**पंचायत समिती, कल्याण**



## Team Who Dreamed...

डॉ.रुपाली खोमणे

श्रीम.वैशाली सावंत

श्री.अनिल सुरोशी

श्री.नितीन पाटील

श्रीम.वर्षा कदम

श्रीम.सीमा इगवे

श्रीम.लक्ष्मी बिराजदार

श्रीम.माधुरी चौहान

श्रीम.अश्विनी लकडे



## Helping Hands...

श्रीम.सुनिता मोटघरे

श्रीम.विद्या नाईकवाडी

श्री.दादू कोकाटे

श्रीम.शोभना दळवी

श्री.दिनानाथ दूधसागरे

श्रीम.प्रियंका सुतार

श्री.दिपक कस्तुरे

श्रीम.विभावरी राणे

श्री.गजेंद्र वेखंडे

श्री.हर्षद खंबायत

श्री.आत्माराम पागडे



संकल्पना चित्रे आंतरजालावरून साभार...


क
क
कवितेचा

# शुभेच्छा पुष्प

**मा.श्री.मनुज जिंदल (IAS)**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,ठाणे.

प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये काही अंगभूत प्रतिभा असतात, त्या शोधून त्याचे संगोपन करून, त्या विकसित करण्यासाठी 'कवितांचे दालन' ह्या उपक्रमा अंतर्गत बालसाहित्य निर्मिती हा एक अभिनव उपक्रम पंचायत समिती कल्याण शिक्षण विभागाच्या प्रेरणेने व शिक्षकांच्या मार्गदर्शनाने जिल्हा परिषद शाळेतील नवोदित बालकवींचा कवितासंग्रह प्रकाशित होत आहे.याचा मला विशेष आनंद आहे.

विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास हे शिक्षणाचे मुख्य ध्येय साध्य करताना भावनिक विकास हा मुख्य गाभा आहे ही मध्यवर्ती कल्पना मनात ठेवून 'कवितांचे दालन' ह्या उपक्रमा अंतर्गत निर्मिलेल्या 'क क कवितेचा' या विद्यार्थ्यांच्या स्वरचित कवितासंग्रहातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे दर्शन घडत आहे.

उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची संवेदनशीलता जागृत होईल, त्यांच्या मनातील भावना, विचार, कल्पना यांच्या अभिव्यक्तीला उत्तम संधी मिळेल व त्यातूनच कळतनकळत ते भाषेला समृध्द करीत जातील आणि मराठी साहित्याला समृद्ध करणारी भावी पिढी निर्माण करण्यास हातभार लागेल असा माझा ठाम विश्वास आहे.

**मा.डॉ.भाऊसाहेब कारेकर**
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद, ठाणे.

पंचायत समिती कल्याण शिक्षण विभाग यांच्या विद्यमाने जिल्हा परिषद शाळा कल्याण मधील विद्यार्थ्यांचे कवितांचे दालन या उपक्रमांतर्गत क क कवितेचा हे शीर्षक असलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वरचित कविता संग्रहाचे प्रकाशन होत आहे. याचा विशेष आनंद होत आहे .

क क कवितेचा म्हणजे कविता शिकण्याची पहिली पायरी. जसे आपण पहिलीतील मुलांना अ अ अननसाचा शिकवतो तसे आपल्या मनातील भावभावना, निसर्गप्रेम या कवितेतून व्यक्त होते. शाळेबद्दल, शिक्षकांबद्दल, नात्यांबद्दल, कृतज्ञता प्रेम असे विविध विषय कवितेतून वाचायला मिळतात.

मुलांना कौतुकाची थाप मिळाली की ती आपल्या नैसर्गिक उर्मीने झपाटून जातात. पंचायत समिती कल्याण गटशिक्षणाधिकारी डॉ. रुपाली खोमणे मॅडम यांच्या प्रेरणेतून शिक्षकांनी कुशलतेने मुलांच्या भाव विश्वातील बालमनाला साद घालून त्यांना लिहते केले आहे. बालकविता सुंदर, सहज व सोप्या शब्दात आणि आशययुक्त कवितेतून कागदावर उतरल्या आहेत. या उपक्रमाबद्दल अभिनंदन आणि बालकवींच्या 'क क कवितेचा' मन:पूर्वक शुभेच्छा!

# शुभेच्छा पुष्प

**मा.श्रीम.ललिता दहितुले**
शिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद,ठाणे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये भाषा महत्त्वपूर्ण भूमिका बजावीत असते. संस्कृती निर्मिती, संस्कृती रक्षण आणि संस्कृती संवर्धन या दृष्टीनेही भाषेचे महत्त्व प्रचंड आहे.

नवीन शैक्षणिक धोरण २०२० यातील मूलभूत सिद्धांतांना यशस्वी करण्यासाठी शिक्षकाची भूमिका महत्वपूर्ण आहे. विद्यार्थ्यांच्या अंगभूत प्रतिभा, कल, आवडीनिवडी ओळखून त्या विकसित करण्यासाठी आमचे शिक्षक सातत्याने विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबवित आहेत.

'क क कवितेचा' या बालकविता संग्रहातील प्रत्येक कविता वाचताना विद्यार्थ्यांच्या मनातील भावविश्व उलगडताना दिसून येते. मुले आपल्या मनातील भावना, कल्पना मुक्तपणे स्वत:च्या शब्दात व्यक्त करण्यासाठी चपलखपणे शब्दांची योजना करत आहे हे पाहून व वाचून मनाला अतिशय आनंद झाला. भाषेतील साहित्याचा सांस्कृतिक वारसा नवीन पिढीमध्ये रुजविण्यासाठी 'क क कवितेचा' या काव्यसंग्रह सारखे उपक्रम असेच अविरत चालू राहावे ही काळाची गरज आहे. कल्याण पंचायत समिती शिक्षण विभागाद्वारे चालू असलेल्या ह्या नाविन्यपूर्ण कार्यास माझ्या मनापासून शुभेच्छा!

**मा.श्री.अशोक भवारी**
गट विकास अधिकारी
पंचायत समिती, कल्याण

'क क कवितेचा' या कवितासंग्रहातुन बालकांना स्वनिर्मितीचा आनंद मिळाला. 'दिसामागे लिहित जावे...' या उक्तीप्रमाणे विद्यार्थ्यांच्या भावनांचा मार्ग या उपक्रमातून मोकळा झालेला आहे.व्यक्तिमत्व विकासाचा अत्यंत महत्वाचा पैलू ह्या उपक्रमातून घडवला आहे.

जिल्हा परिषदेच्या शाळांतील सर्व विद्यार्थ्यांना अनेकविध अनुभव वेगवेगळ्या उपक्रमातुन मिळावेत यासाठी शिक्षक सातत्याने प्रयत्न करत असतात. याच प्रयत्नातुन बाल विश्वातील जाणिवांना कल्पनांचे पंख लावून स्वप्नभरारी घेण्याचा हा उपक्रम आहे. कवितेतुन कवीच्या संवेदनशीलतेचे आणि मनस्थितीचे दर्शन घडते. कवितेच्या माध्यमातून कवी शब्दांची समर्पक आणि अर्थपूर्ण गुंफण करत भाषेला समृद्ध करीत असतो.

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात 'क क कवितेचा' ह्या विद्यार्थ्यांच्या स्वरचित कवितासंग्रहाच्या निमित्ताने बालसाहित्यिक घडवण्याचा उपक्रम नाविन्यपूर्ण आहे. विद्यार्थ्यांच्या काव्यलेखनाची कला अशीच बहरत राहो.त्यांच्या लेखणीतून उत्कृष्ट कविता निर्माण होवो ही सदिच्छा अन शुभेच्छा!

# अंत:स्वर

'आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहीकडे' या ओळी जगायला बालकांना शाळेत मिळतात. घर, परिसर आणि आजुबाजुच्या सर्व सजीव निर्जिवांसोबत जन्मल्यापासूनच बालकांचा एक अव्यक्त संवाद सुरुच असतो. हा संवाद मनुष्याच्या निरंतर विद्यार्थी असण्याची पहिली पायरी आहे. मुल जसजसे मोठे होईल तसे शब्दातून व्यक्त व्हायला लागते, तेव्हाच मूर्त व अमूर्त स्वरुपातील कोणत्याही गोष्टीची दखल घेऊन मत व्यक्त करण्याइतपत प्रगल्भता त्याच्यात येत राहते.

अ....अ....अननसाचा यापासून होणारा शिक्षणाचा श्रीगणेशा बालकांचा भाषिक विकास होणसाठी व बौध्दिक विकासाचे उद्दिष्ट ठेवून झालेला असतो. अशातच हल्लीच्या बालकांना पुस्तकी ज्ञानापेक्षा ज्ञानरचनावादाधारीत शिक्षण देण्याची गरज कालातीत असल्याचे दिसून येते. त्याच हेतूने बालकांच्या भावनिक विकासाचे बहुविध आयाम उत्स्फुर्तपणे व्यक्त होण्याच्या माध्यमातून प्रवाही राहावेत यासाठीच्या मनस्वी प्रयत्नांचे फलित म्हणजे क....क.... कवितेचा.

अगदी लहान वयोगटात सुध्दा बालकांची सृजनक्षमता किती उच्च दर्जाची असु शकते याचा पुरावा या संग्रहातुन नक्की मिळेल. आई, शाळा, नातेवाईक, सण, निसर्ग, देश, आहार-विहार, व्यवसाय अशा बहुविध विषयांवरील कविता निश्चितच समाधानाची व आनंदाची बाब आहे.

'रस्त्यावर दिसते व्हॅन
मी होणार बिझनेस मॅन'

या वरुन दिसते की, अत्यंत क्रांतिकारी स्वरुपाचे विचार मुलांमध्ये रुजत आहेत. भविष्यातील फक्त नोकरीधिष्ठीत शिक्षण न देता त्यास स्वयंपुर्णतेचा धडा आपण शाळेत देतो याचा अभिमान सुखावून जातो.

'उंच आकाशी फडकत राहो
आमचा प्रिय तिरंगा'

या ओळीसुध्दा मुलांच्या भावविश्वातील राष्ट्रप्रेम चेतविणारी महत्वाची बाब आहे. देशासाठी प्राण हातात घेऊ शकणारी पिढी नव्या आव्हानांना व वैश्विक खेड्याच्या आवाहनास समर्पक प्रतिसाद देण्यास तयार होत आहे ही निश्चितच प्रेरणादायी आहे.

एक बालकवयित्री सहज लिहिते की, 'मला वाटते साखर व्हावे, तिच्यासारखे गोड रहावे' यावरुन स्वाभाविक गोडवा, मृदृता, सामाजिक सहसंबंध आणि अर्थपुर्ण व सुसंवादात्मक संप्रेषण या बाबतीत खात्री पटते.

यातील सगळेच प्रतिभावंत आहेतच त्याचबरोबर उद्याच्या भारताचे भविष्य आहेत. त्यांच्या या मुलभूत प्रेरणाच्या पंखांना बळ देण्यासाठी खारीचा वाटा उचलण्याचा हा छोटासा प्रयत्न.

शुभेच्छासह...

**डॉ. रुपाली खोमणे**
गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती, कल्याण

# कवितेचे पान



१. आजी
२. चिमणी
३. गमती जमती
४. प्रजासत्ताक दिन
५. महिंद्रथार
६. कोरोना
७. नक्षी
८. पाऊस
९. आई
१०. मला वाटते
११. होळी
१२. गोरी गोरी पोर
१३. गुरुजी
१४. फुलपाखरु
१५. बाळा
१६. आईचे घड्याळ
१७. गंमत भाज्यांची
१८. एक होता चित्रकार
१९. झाडे
२०. माझा प्राण
२१. जादूची छडी
२२. दिवाळी सुट्टी
२३. चार बहिणी एकच भाऊ
२४. माझे स्वप्न
२५. आई आणि पाऊस
२६. शाळा
२७. मोबाईल
२८. आली दिवाळी
२९. जेवण
३०. परी ग परी
३१. फुलपाखरे
३२. झाडू
३३. लळा
३४. विमान
३५. ताई
३६. गुढीपाडवा
३७. संगणक
३८. सूर्य
३९. समीक्षाची परीक्षा
४०. बहिण भाऊ
४१. परिपाठ
४२. बाप्पा
४३. कावळा
४४. माझा परिवार
४५. शहीद
४६. आम्ही मित्र
४७. एक होते गाव
४८. कवायत
४९. गणतंत्र दिन
५०. शाळा
५१. मेरी गुडियारानी
५२. फणस
५३. कुत्रा
५४. जीवन जगता जगता
५५. प्यारा भाई
५६. परीच्या दुनियेत
५७. मॅरेथॉन



# आजी

आजीची माया असतेच अशी,
मनाच्या कुपीत जपावी जशी..!
आजीची माया खूप मोठी,
तूप रोटी साखर गाठी..!
आजीची माया असतेच अशी,
मुरंब्याची गोडी वाढावी जशी..!
आजीची माया वर्णू किती?
लाडाने मला म्हणते नाती..!
माझी आज्जी खुप गोड,
जशी हापूस आंब्याची फोड..!!

जानवी चिंतामण मगर
जि. प. शाळा अनखरपाडा



# चिमणी



चिऊ चिऊ चिमणी गाणी गाई.. ।
चिमणी भुरकन उडून जाई.. ॥
घरासाठी झाड शोधण्या,
वणवण करत फिरत जाई.. ।
पिलासाठी चारा शोधण्या
फिरत घिरट्या घालत राही.. ॥
गवत काड्या तार दोरा,
चिमणी मिळवत फिरते.. ।
मग ती झाडावरती,
घरटे सुंदर बांधते.. ॥
म्हणून आपण चिमणीचे,
कधी घरटे पाडू नये.. ।
मुक्या बिचाऱ्या जीवांचे,
कधी शाप घेऊ नये.. ॥

जीविशा विष्णू मोगरे
जि. प. शाळा सांगोडे

# गमती जमती

माझी शाळा आहे लहान,
आम्ही ठेवतो  शाळेचा मान..!
माझ्या शाळेत आहे गोष्टींचे वाचनालय,
किती वाचले तरी न संपे हिमालय..!
शाळेत वाटे कधी कधी अभ्यासाची कटकट,
पण सर्वांनाच होते खेळायची घाई पटपट..!
आमच्या शाळेत असते कधी भेळ मस्त,
सर्वच मुले करतात ती झटपट फस्त..!
जेव्हा आम्ही मिळवतो वहीवर बाईंची सही,
घरी गेल्यावर गोड गोड लाडू देते आई..!

पूजा गणेश केशव
जि.प.शाळा,सांगोडे



# प्रजासत्ताक दिन

प्रजासत्ताक दिन साजरा झाला,
शाळेत आमच्या झेंडा फडकवला..!
प्रजासत्ताक दिनाला काढली प्रभातफेरी,
घोषणा देऊ लागली मुले-मुली सारी..!
प्रजासत्ताक दिनाला झाली भाषणे,
विद्यार्थ्यांनी गायले देशभक्तीचे गाणे..!
रंगीबेरंगी कपडे घालून नाचगाणी झाली,
सर्वांनी टाळ्या वाजवून खूप मजा केली..!
सर्वांत शेवटी खाऊ मिळाला,
प्रजासत्ताक दिनाचा शेवट झाला..!

हंसिका नारायण मांजरे
जि. प. केंद्रशाळा गुरवली

# महेंद्र थार

माझ्या भावाकडे पैसे फार,
त्याच्याकडे आहे महेंद्र थार..
ती आहे फोर एक्स फोर,
त्यात बसून  नाही होत बोअर..
वापरतो माझा भाऊ एटीएम,
त्याच्याकडे आहे केटीएम..
त्याला कमी नाही कशाची,
केटीएम आहे लाखाची..
आमचा आहे मोठा बंगला,
लांबून दिसतो खूप चांगला..
बंगल्यापुढे गाड्या फार,
केटीएम आणि महेंद्र थार..!!

साहिल एकनाथ पितांबरे
जि. प. शाळा नडगाव १





# कोरोना

शिकविलास तु धडा लय भारी
सर्वांना पाडलेस तु आजारी
फिरूनी जा आता तु माघारी |धृ|
बाहेर जाताना मास्क वापरी,
तिथून येऊन सॅनिटायझर मारी..
स्वतः ची काळजी, स्वतः करी,
कोरोना फिरूनी जा तु माघारी |१|
विसरली माणसाची माणूसकी,
विसरली नाती-गोती लोकं सारी..
कोरोना फिरूनी जा तु माघारी,
येऊ नको तू पुन्हा आमुच्या दारी  |२|

कार्तिक चंद्रकांत सांबरे
जि. प. शाळा पोई

## नक्षी

सुंदर आमची शाळा,
शाळेत आला कावळा..
वर्गात होती मुले,
त्यांनी आणली फुले..
फुले होती जंगलात,
जंगल गेले मंगळात..
तिथे होती खुर्ची,
तिला लागली मिरची..
मिरची होती तिखट,
आम्ही खाल्ली फुकट..
मैदानात आला पक्षी,
आम्ही काढली नक्षी..
नक्षी गेली ढगात,
मुले आली वर्गात..
वर्ग झाला शांत,
मला वाटली खंत..!!

कल्याणी योगेश जाधव
जि. प. शाळा फळेगाव



## पाऊस

पहिला पाऊस...
भिजण्याची हौस...
येते खूप मजा...
नंतर मिळते सजा...
भिजून होते सर्दी...
दवाखान्यात गर्दी...
पावसाची गंमत...
मित्रांची संगत...
पाऊस आला आला...
धूम ठोकून पळा...!!

स्वाती मांडवकर
जि.प.शाळा सोनारपाडा



# आई

आई माझी खूप प्रेमळ,
ती आहे खूप निर्मळ..!
जन्म दिला आहे मला,
कशी  विसरू मी तिला..?
राब राबून करते काम,
आमच्यासाठी गाळते घाम..!
तुटक्या चपला शिवून घालते,
गरीबी तिच्या मनात सलते..!
आई आहे खूप छान,
तिच्यामुळे मिळतो मान..!
अंगाई गीत ती गाते,
थोपटूनी झोपी घालते..!
कष्ट करून रातदिन,
जमविते आमच्यासाठी धन..!
खूप आईचे उपकार,
मानू कसे मी आभार..!
आई माझी खूप प्रेमळ,
ती आहे खूप निर्मळ..!!

लावण्या हेमंत दळवी
जि प शाळा उसरघर




# मला वाटते....

मला वाटते विमान व्हावे,
आकाशामध्ये उडत राहावे..!
मला वाटते होडी व्हावे,
पाण्यामध्ये पोहत राहावे..!
मला वाटते घोडा व्हावे,
दूर  देशी फिरत राहावे..!
मला वाटते पेन व्हावे,
सुंदर कविता लिहत राहावे..!
मला वाटते आईस्क्रीम व्हावे,
तिच्यासारखे थंड रहावे..!
मला वाटते साखर व्हावे,
तिच्यासारखे गोड रहावे..!

लक्षिता महतो
जि.प.शाळा- निळजे



# होळी

आली रे आली, होळी आली ।
चला आज, पेटवूया होळी ॥
जीवनातील उत्साह, म्हणजे होळी ।
पुरणपोळीचा स्वाद, म्हणजे होळी ॥
आयुष्यात रंग भरणारी होळी ।
पुरणपोळीवर ताव, म्हणजे होळी ॥
कंटाळा, आळस, वाईटाची करू होळी ।
रंगाच्या रंगात रंगुनी, खेळू होळी ॥

यश रवींद्र पाटील
जि. प. शाळा, सांगोडे

# गोरी गोरी पोर

कानानं झुमकं, नाकान नथनी,
गोरी गोरी पोर ही कोणाची..?
गोरी गोरी पोर ही सुहास ची गं..!
हाताने बांगड्या, पायांना पैंजण,
गोरी गोरी बहीण तु कोणाची..?
गोरी गोरी बहीण मी सुहानी ची गं..!
भगवा फेटा, हिरवा लुगडा,
गोरी गोरी मैत्रीण तु कोणाची..?
गोरी गोरी मैत्रिण अंजलीची गं..!
गल्यानं हार, कमरेला कंबरपट्टा,
गोरी गोरी नात तु कोणाची..?
गोरी गोरी नात मी मनिषाची गं..!

श्रावणी दांडेकर
जि प शाळा पिसवली



# गुरुजी

पहिलं पाऊल शाळेत टाकल्यानंतर,

पटली ओळख गुरुजींची..!

आमच्या गुरुजींनी शिकवल्यानंतर,

लागली ओढ अभ्यासाची..!


मनाने साधे रूपाने गोड,

गुरुजींच्या हसऱ्या चेहऱ्याला नाही तोड..!

माया करतात जवळ घेतात,

आम्हाला खूप खूप आवडतात..!

चंदना रमेश बोटकोंडले
जि.प. शाळा घोटसई



# फुलपाखरू

पहा कसे उडते हे फुलपाखरू,
बसते फुलांफुलांवर वाटे त्याला धरू..!
इकडुन-तिकडे मजेत उडते,
मनात येई तसे खेळते..!
हिरवा, जांभळा,पिवळा,काळा रंग,
जो-जो पाही त्याला करी दंग..!
असे वाटते त्यांच्यासोबत उडावे,
सगळे विसरून मजेत राहावे..!

साक्षी रोहिदास वाघे
जि.प.शाळा वासुंद्री



# बाळ


घरी आहे सोहळा,
पाहुणे झाले गोळा..!
सोहळ्यात आला बाळा,
बुडवली त्याने शाळा..!
खात होता गोळा,
झाला मोठा घोटाळा..!
बाळा खातो खाऊ,
तिकडून आली माऊ..!
माऊने पळवली पुडी,
आईने मारली उडी..!
आईने लावला लळा,
बाळ झाला खुळा..!
गंमत सगळी पाहून,
माऊने मारला डोळा..!



खुशाली दिनेश चौधरी
जि. प. शाळा फळेगांव

# आईचे घड्याळ

आई गं आई सहा वाजले बाई,
दुध आणायची केवढी घाई..!
आई गं आई सात वाजले बाई,
चहा मध्ये साखर घातलीच नाही..!
आई गं आई आठ वाजले बाई,
आंघोळीला पाणी गरमच नाही..!
आई गं आई नऊ वाजले बाई,
शर्टाला एक बटनच नाही..!
आई गं आई दहा वाजले बाई,
माझी गणिताची कुठे गेली वही..!
आई गं आई अकरा वाजले बाई,
जेवण करायची किती तुला घाई..!
आई गं आई बारा वाजले बाई,
पळतच  शाळेत सोडायला जाई..!






सत्री पिन्टू कुरील
जि.प. शाळा नांदिवलीपाडा



# गंमत भाज्यांची

मला काय वाटते सांगू का..?

भाज्यांची गंमत दाखवू का..?

चवळीची शेंग वाटते कशी..?

एखादी सुंदर मुलगी जशी..!

टोमॅटो असतो लाल लाल..,

दीदी चे आमच्या गोबरे गाल..!

भूतोबा दिसला अंधारात..,

भोपळाच होता तो उजेडात..!

कडू कारलं पाहिले का कुणी..?

नाजूक कोरीव जशी लेणी..!

फ्लॉवर जणू वाटतो असा..,

फुलांचा बुके आणलाय जसा..!

बटाटा असतो जाडोबा..,

सगळ्या भाज्यांचा लाडोबा..!

हरिप्रिया दत्ता पाटील
जि. प. शाळा सांगोडे

# एक होता चित्रकार

एक होता चित्रकार ..!

त्याला होते मित्र फार

पण शाळेत मिळायचा सरांचा मार

तो अभ्यासात नव्हता हुशार फार

त्याने मानली नाही हार

काढत गेला चित्र फार

त्याची चित्रे जादूगार

चित्र काढायचा दिवसाला चार चार

वर्गातली मुले झाली त्याची सगळी यार

मुलांसोबत शिकला तो वाचायला

आता लागला सर्वांसोबत नाचायला..!!!

काजल विलास राम
जि.प. शाळा निलजे



# झाडे ...

झाडे देतात गार छाया,
माणसावर सावलीची माया..!
झाडे असतात परोपकारी,
देतात घरटी, चारा भारी..!
झाडे देतात खूप काही,
लोकांना त्यांचे महत्व नाही..!
झाडे थांबवतात मातीची धूप,
पाऊस पडतो खूप खूप..!
झाडे कधी तोडू नये,
जखम त्याला करू नये..!
झाडे लावू झाडे जगवू,
धरतीवरती रान उगवू..!

स्वाती मांडवकर
जि.प.शाळा सोनारपाडा



# माझा प्राण

शाळा आहे छान छान,
तिचा आहे मला अभिमान..!
शाळेत आहे फळा काळा,
मला लागला पुस्तकांचा लळा..!




शिक्षकांना देतो आम्ही मान,
आम्हांला देतात भरपूर ज्ञान..!
शाळेतील मुले बहीण भाऊ,
एकत्र राहतो, खातो खाऊ..!
शाळा आहे माझी छान,
ती तर आहे माझा प्राण..!!

वैष्णवी रोहिदास मोरे
जि.प.शाळा चवरे



# जादूची छडी

एक होती परी, आली माझ्या घरी,
माझा हात धरून, घेऊन गेली बरोबरी..!
परीच्या हातात, होती जादूची छडी,
तिने मला दिली, एक सुंदर घडी..!
खायला दिली मला, गोड गोड वडी,
तिच्या पंखांना होती, हिऱ्याची खडी..!
ये बात मेरे मन को, लगी बहुत बडी,
मै उसके साथ,बहुत दूर उडी..!
ओ बोली, जब होगी मुसीबत खडी,
तो रहूंगी मैं, एक बहन जैसी खडी..!



साई हनुमंत शिंदे
जि.प. शाळा निळजे



# दिवाळी सुट्टी



दिवाळी आली, दिवाळी आली
शाळेलाही सुट्टी लागली..
सगळी मुळे गोळा झाली,
फटाक्यांची गाडी आली..!
पाऊस, चक्री, चुरचुरी,
उडू लागली सुरसूरी..
चिवडा, लाडू, चकली,
करंजी आणि शंकरपाळी..!
दिवाळी आली दिवाळी आली,
नवीन कपडे , खेळणी आली..!
रांगोळ्या काढू अंगणात,
किल्ले मागील परसात..
भाऊबीजेला मामा आला,
सोबतीला मामी आली..!
दिवाळी आली दिवाळी आली,
मित्रांसोबत मजा आली..!!

जान्हवी संदीप दिवाणे
जि. प. शाळा गेरसे

# चार बहिणी एकच भाऊ..

चार बहिणी, एकच भाऊ,
अख्खा दिवस खातो खाऊ.
पहिली रिया, दुसरी प्रिया,
तिसरी जिया ,चौथी सिया.
खाऊ खाऊन, झालाय लठ्ठ,
अभ्यासात आहे मठ्ठ.
चार बहिणी, एकच भाऊ,
सोबत त्याच्या असते माऊ.
सगळे त्याचे करतात लाड,
दुपारपर्यंत झोपतो गाढ.
रक्षाबंधनाला बांधून राखी,
बहिणीकडेच मागतो पैसे बाकी.
चार बहिणी, एकच भाऊ,
नाव त्याचे आहे राऊ.

जिया तुकाराम दीवाने
जि. प .शाळा गेरसे



# माझे स्वप्न...

घरात माझे खूप लाड,
मला लागलय स्वप्नाचं याड..!
रस्त्यावर मला दिसते व्हॅन,
स्वप्न माझे होईन बिझनेस मॅन..!
बाबांची आमच्या जमीन फार,
त्यावर बांधू बिल्डिंग चार..!
भावाकडे माझ्या आहे ऑडी,
अहो ती आहे लाखाची गाडी..!
ऑडीत आहेत सीट चार,
त्यात बसायला मजा फार..!!

प्रेम श्रीनाथ जाधव
जि. प. शाळा नडगाव १

# आई आणि पाऊस

आई ग आई, सांग ना जरा,
कधी पडतील पावसाचा धारा..?
आभाळातून येते पावसाचे पाणी,
आई गाते गोड गोड गाणी..!
पावसात भिजते झाडांची काया,
माझ्यावर आईची खूप खूप माया..!
ढगाकडे पाहून नाचतो मोर,
आईच्या जीवाला मुलाचा घोर..!

रोहित दीपक दिवाणे
जि .प. शाळा गेरसे






# शाळा

आमची शाळा छान -छान,
शाळेत सुंदर बाग छान..!
शाळेत आहेत तीन बाई,
पोहोचवायला येते  आई..!
आम्ही शाळेत अभ्यास करतो,
गाणी-गोष्टी दंगाही करतो..!
आमची काकी खुप भारी,
आमच्यासाठी जेवण करी..!
अशी आमची सुंदर शाळा,
आम्हांला लावते खुप लळा..!

गायत्री चंद्रकांत जाधव
जि.प.शाळा वासुंद्री



# मोबाईल

आई म्हणते ,"फोन नको घेऊ बार- बार,"
पण मला तर  मजा वाटे त्यातच फार.
मोबाईल वर गेम खेळताना नाही राहत भान,
आई म्हणते,"फोन ठेव नाहीतर धरेन तुझा कान."
मोबाईल वर खेळता खेळता दिवस गेला सारा,
आईने घेतला फोन अन दिला हाताने मारा.

आदित्य नरेश सुरोशी
जि.प.शाळा चवरे



# आली दिवाळी

आली माझ्या घरी दिवाळी आली.. ।
बहिण भावाला भाऊबीजेला ओवाळी.. ॥
दिवाळी सणाला येतात, आत्याची मुले नकटी.. ।
आमच्या वाटेचा खाऊ खातात फुकटी.. ॥
आई काढते ठिपक्यांची रांगोळी.. ।
बाबा गाई म्हशींना ओवाळी.. ॥
रंगरंगोटी सजावट करतो आम्ही.. ।
फटाक्याच्या माळा फोडून बैल झुंजवतो आम्ही.. ॥
आईने बनवलेला नैवेद्य देवाला पहिला.. ।
चव पाहण्यासाठी मी आधीच खाल्ला.. ॥

मोनिया संतोष मोगरे.
जि. प. शाळा सांगोडे

# जेवण

जेवण बनवले आईने,
वाढले माझ्या ताईने..
खिरीत होते मनुके काजू,
खाताना मी लागले लाजू..
वरणासोबत  आंब्याची फोड,
सोबत होती पापडाची जोड..



आंब्याची फोड फारच आंबट,
चटणी झाली खूपच तिखट..
जेवणाची थाळी सजली,
बघता बघता पटकन संपली..!

श्रद्धा विलास जाधव
जि. प. केंद्रशाळा गुरवली



# परी ग परी

परी ग परी ये धरतीवरी..
पाहुणी ये माझ्या घरी..!
परी ग परी देऊ का चहा..?
चहासोबत बिस्कीट खा..!
परी ग परी जादूची छडी..
चंद्राच्या गाडीला हरणाची जोडी..!
परी ग परी मला उंच उंच उडू दे..
परी ग परी मला सुंदर पंख फुलू दे..!

धनश्री अविनाश शेलार
जि .प .शाळा गेरसे

# फुलपाखरे

फुलपाखरे असतात रंगीबेरंगी..
उडतात ते एकमेकांसंगी..!
फुलपाखरांना आवडती फुले..
त्यांच्या मागे धावती मुले..!
फुलपाखरे बसती फुलांवरती..
पकडायला गेले की उडतात वरती..!
हळूच जावे तरी त्यांना कसे कळे..?
पंखांना त्यांच्या असतात का डोळे..?
देवाने बनवले त्यांस किती छान..?
पाहून हरपते सर्वांचे भान..!!




शितल ईश्वरचंद्र गौड
जि. प. शाळा संदप

# झाडू

झाडू आहे आमचा मित्र,
कचरा काढतो सर्वत्र..!
स्वच्छता आहे त्याचे काम,
शाळा करतो लख्ख छान..!
झाडून काढतो सर्व रोग,
सर्वांना देतो आरोग्ययोग..!
झाडूची दिवाळीत पूजा करतो,
झाडूला आम्ही लक्ष्मी मानतो..!!

बद्रीनाथ कल्याणकर
जि.प.शाळा सोनारपाडा








जातो शाळेत आम्ही,
अभ्यास करतो खूप...
मस्ती करतो थोडी थोडी,
चित्र काढतो होडी...
खेळ खेळतो वेगवेगळे,
मित्रमैत्रिणी सगळे...
काळा आहे वर्गातील फळा,
बाईंचा पेन निळा निळा...
आम्हाला लागला बाईंचा लळा,
शाळा सुटली पळा पळा..

अंगद गणेश कुंबळे
जि. प. शाळा पिसवली

# विमान



विमान असतो मोठा मोठा,
आकाशात गेल्यावर दिसतो छोटा..
विमानात जाताना येते मजा,
जसा काय ऐटीत बसतो राजा..
पांढरा शुभ्र विमान दिसतो कसा,
जसा आकाशात उडतो मासा..
विमानाला असतात दोन पंख,
बसतात त्यात लोक असंख्य..
विमानाची गोष्ट खूपच न्यारी,
आम्हाला त्याची आवड भारी..

भूमिका विश्वनाथ केणे
जि. प. केंद्रशाळा गुरवली

# ताई

ताई येते शाळेतून,
मोबाईल घेते हातातून..
ताई माझी नाचते छान,
गाताना घेते तान..
ताई माझा घेते अभ्यास,
तपासल्यावर म्हणते शाब्बास..
ताई खट्याळ मस्तीखोर,
तरी आई सारखीच थोर..

प्रणय सदानंद दिवाणे
जि .प .शाळा गेरसे



# मराठी नववर्ष गुढीपाडवा

सण आयलाय गो गुढीपाडव्याचा..
मनी आनंद मावना नव्या वर्षाचा..
चैत्राच्या पहिल्या दिवसाचा,
सन मोठा गुढीपाडवा..
कडुलिंबाच्या पानाला,
साखरगाठीचा गोडवा..
गुढीपाडव्याच्या सणाला,
जत्रा भरते  कार्लेला..
आमी सगळे जातूया,
एकविरा आईच्या दर्शनाला..
पाटीवर पूजन करू शाळेत,
सरस्वतीचे गुढीपाडव्याला..
स्वागत करू सगळेजण,
मराठी नववर्षाचे..

आरती गणेश केशव
जि. प. शाळा सांगोडे



# संगणक

मदत करतो माणसाला फार,
संगणक असतो खूप हुशार..!
संगणकाला मिळते मॉनिटरची साथ,
की-बोर्ड, माऊस देतात हात..!
संगणकावर काढता येते चित्र,
भेटायला येतात ऑनलाईन मित्र..!
संगणकावर करता येतो अभ्यास,
मनोरंजनही होते तासनतास..!
संगणक चालवायला येते मजा,
संगणक हा मित्र माझा..!!



दिव्या सचिन जाधव
जि. प. केंद्रशाळा गुरवली



# सूर्य

पहाट होताच अंधार संपतो,
चंद्र रुसतो सूर्य उगवतो..
सूर्याचा प्रकाश सगळीकडे,
सोनेरी किरणांचे जणू कडे..
सूर्य जरी दिसतो छोटा,
पृथ्वीपेक्षा खूप मोठा..
उगवतीला मैत्रीण उषा,
मावळतीला वाट पाही निशा..
सूर्यप्रकाश हिरवे रान,
वृक्षामध्ये येतात प्राण..!

स्वाती मांडवकर
जि.प.शाळा सोनारपाडा

# समीक्षाची परीक्षा

एक होती समीक्षा,
तिची होती परीक्षा.
तिने नव्हता केला अभ्यास,
मागच्या वर्षीही झाली नापास.
तिच्यासाठी आली रिक्षा,
रिक्षात होती प्रतीक्षा.
पेपर होता अकराला,
ती पोहोचली बाराला.
काठावरती झाली पास,
आता करते रोज अभ्यास..!

मयुरेश योगेश दिवाणे
जि .प. शाळा गेरसे















# बहिण भाऊ

बहिण करते भावाचे लाड,
भाऊ असतो जाड,
बहिण असते ताडमाड..!
बहिण भावाला मारते,
तेवढी मायाही करतो,
रक्षाबंधनाला ओवाळते..!
बहिण भावाचं नातं लयी गोड,
दूर तरी असते ओढ,
साऱ्या जगात नाही तोड..!

साक्षी बाळाराम केशव
जि. प. शाळा सांगोडे

# परिपाठ

आमची सकाळ जाते उत्साहात,
कारण सकाळी घेतात परिपाठ..
सुविचार ऐकून वाजवल्या टाळ्या,
गुरुजींनी परिपाठाच्या लावल्या पाळ्या..
परिपाठ असतो मराठी, हिंदी, इंग्रजी,
शाब्बासकी देतात आमचे गुरुजी..
रोज परिपाठाला दिनविशेष, बातमी,
ऐकून हुशार होतो आम्ही..
प्रार्थनेला वाजवला पेटी-तबला,
पसायदान झाल्यावर परिपाठ संपला..

देवयानी दिनेश दळवी
जि. प. केंद्रशाळा गुरवली







# बाप्पा

बाप्पा आले बाप्पा आले,
सगळ्यांना त्यांनी दर्शन दिले..!

बाप्पाचा झाला उत्सव सुरू,
सगळे लागले नमस्कार करू..!

बाप्पाला आवडतो मोदक फार,
गळ्यात कंठी  मोतीहार..!

आरती त्याची सर्व करू,
आणि मोदक फस्त करू..!

बाप्पा तुझी अनेक नावे,
भक्ती करतो मनोभावे..!

बाप्पा सुखी ठेव सर्वांना,
हीच तुझ्याकडे  प्रार्थना..!

स्वाती मांडवकर
जि.प.शाळा सोनारपाडा




# कावळा

एक होता जंगली कावळा,

तो होता काळा काळा..!

त्याच्या घरी फळा काळा,

काळ्या खडूने लिहिले सोळा..!

शिकवू लागला के फोर कावू,

मांजर म्हणे एम फोर मावू..!

त्यानी केला कल्ला कल्ला,

मांजरीने त्यावर मारला डल्ला..!

तन्मय धोंडीराम कांबळे
शाळा नांदिवलीपाडा



# माझा परिवार

निखिल माझे नाव,

उतणे माझे गाव..

सविता माझी आई,

हर्षदा माझी ताई..

काळूराम माझे बाबा,

सगळ्यांवर त्यांचा ताबा..

आयुष माझा भाऊ,

आम्हाला आणतो खाऊ..

आम्ही तिघे भाऊ,

मिळून खाऊ खाऊ..

निखिल काळुराम भोईर
जि. प. शाळा उतणे



# शहीद

शहीद झाले अनेक शूरवीर,
रक्षण करण्या भारत भुमीचे..
मुळीच नाही विसरू आपण,
बलिदान या क्रांतिवीरांचे..!
वंदन करूया त्या लढवय्यानां,
जे लढले स्वातंत्र्यासाठी..
गाऊया राष्ट्रगान आपल्या,
भारत मातेच्या अभिमानासाठी..!
विविधतेने नटलेला,
माझा भारत देश महान..
विविधतेतही एकता ही,
खरी भारताची शान..!
भूमीवर या वाहे पवित्र,
यमुना आणि गंगा..
उंच आकाशी फडकत राही,
आमचा प्रिय तिरंगा..!!





आकांक्षा गायकवाड
जि.प.शाळा खोणी

# आम्ही मित्र

अंगद काढतो चित्र,
झाडे आमचे मित्र !
आर्यन करतो नकला,
संस्कार खेळात रमला !
मित्र नवा इरफान,
चित्र काढतो छान !
कुणीच नाही चिडवत,
कुणीच नाही भांडत !




आम्ही जरी दिसतो वेगळे,
एकमेकांचे मित्र सगळे..!!

अथर्व गणेश पवार
जि. प. शाळा पिसवली

# एक होते गाव

एक होते गाव..
त्याला नव्हते नाव..!
गावात होती माणसं..
घेत होती कणसं..!
कणसात होते दाणे..
किती  गोजिरवाणे..!
त्यांना पाहून माणसे..
गाऊ लागले गाणे..!

सार्थक जयंत केणे
जि.प.शाळा कोंढरी



# कवायत

दर आठवड्याला येतो शनिवार..

कवायतीला येते मजा फार..!

सकाळी सकाळी थंडी वाजते जाम..

कवायत केल्यावर  पळून जाते लांब..!



शिट्टी-ढोल वाजवून सर देतात ऑर्डर..

हातपाय हलवतो, तेव्हा आम्ही भरभर..!

फ्रेश वाटते करताना, व्यायामप्रकार..

योगासनांमध्ये सुंदर सूर्यनमस्कार..!

विसर्जन केल्यावर कवायत संपली..

वाट पाहतो आम्ही, कधी येतो शनिवार..?

निकिता विलास जाधव
जि. प. केंद्रशाळा गुरवली

# गणतंत्र दिन

भारत हमारा देश है,
हमको जान से प्यारा है..!
दुनिया मे सबसे न्यारा है,
सबकी आँखोका तारा है..!
सब बॉर्डर पर लढते है,
ये देश के लिये मरते है..!
तिरंगा कभी झुकने ना पाये,
चाहे जान भलेही जाये..!
हमारा एक ही नारा,
भारत देश है हमारा..!!




आर्या संदीप मिश्रा
जि. प. शाळा नांदिवली पाडा




शाळा एक न विसरता येणारी अशी आठवण...
ज्याची प्रत्येकाने आपल्या आयुष्यात
करून ठेवलीय साठवण...!
आजही जेव्हा शाळा डोळ्यासमोर येते
तेव्हा आठवते ते बालपण...
दंगा मस्ती करता करता जवळ आलेले
मित्र मैत्रिणींचे आपलेपण ...!
गॅदरिंग म्हणजे धम्माल मज्जा
कवायत म्हणजे कठोर सजा...
क्रीडास्पर्धेत खेळ कळतो
कबड्डी जिंकतो खो-खो हरत...!
सहलीची मजाच न्यारी
गुजगोष्टी अन दंगलगाणी...
आठवतात ते शाळेचे रम्य दिवस
आठवतात ते शाळेचे रम्य दिवस...!!

दिशा कृष्णा शिरिस्टर
जि. प. शाळा म्हारळ नं.१

# मेरी गुडिया रानी

मेरी प्यारी गुडिया रानी.....
साथ खेलती,साथ कुदती,
मजे मजे हमे बहुत कराती,
ऐसी मेरी गुडिया रानी...!
साथ मेरे खाना खाती-पानी पीती,
जहाँ भी जाऊ वहा वो आती,
साथ नहाऊ साथ धोऊ..
लाड प्यार से खूब सेहेलाऊ,
ऐसी मेरी गुडिया रानी...!



मैं चूप बैठु तो वो मुरझाये,
मैं हसू तो वो भी हसे,
प्यारी प्यारी बहुत सी बाते,
मेरी वो मन से सुने..
हर पल मेरे साथ वो रहे,
ऐसी मेरी गुडिया रानी...!
साथ मेरे सहेली सी रहे,
स्कूल से जाऊ तो लिपट जाये,
दिनभर की थकान वो दूर करे,
सजधज के फिर तयार हो जाये..
हम घुमने साथ जाए,
ऐसी मेरी गुडिया रानी...!

प्रिया प्रदीपकुमार कनोजिया
जि.प.शाळा देसलेपाडा



# फणस

फणसाच फळ आवडतं मला,
फणस खायला कोकणात चला..!
उन्हाळ्यात येतो फणसाला बहर,
फणस खाण्याचा करतो कहर..!
फणसाची आमच्याकडे खूप झाडे,
गरे खायला  धांदल उडे..!
आमच्या बागेत फणसाचे  रान,
आमची बाग आहे खूप छान..!

रूपाली उदय घरत
जि. प. शाळा नडगाव १



# कुत्रा

दूध भाकरी, मजेत खातो,
भू भू करून पहारा देतो..
खुशाल झोपा आम्हास सांगतो,
शेतीचीही राखण करतो..!
धन्यावरी करी खरी माया,
सेवा करण्यात तत्पर काया..
खाल्या घरच्या भाकरीला जागतो,
इमानी सदा जागा असतो..!
आपल्या मालकाला जपतो,
संरक्षण नेहमी करतो..
असा आहे माझा कुत्रा,
त्याचे नाव  मोतीराजा..!

यश अविनाश रोहने
जि प शाळा गोवेली

# जीवन जगता जगता

जीवन जगता जगता
हवे तसे घडत नसते...
नेहमीच जिंकतो असे नाही,
कधी हरणेही असते..
दुखाःत रडत बसायचे नसते,
सुखात हुरळून जायचे नसते..
जीवन जगता जगता,
नेहमी हसायचे असते...

संकटे ही येत असतात,
जीवन उध्वस्त करून जातात..
जीवन जगता जगता,
कधीच खचायचे नसते..
दैव परीक्षा पहात असते,
त्यात नापास व्हायचे नसते..
जीवन जगता जगता,
कधीच रडायचे नसते...
कधी कुणाचे मन दुखवायचे नसते,
आपलेच सारे असे समजायचे असते..
जीवन जगता जगता..
दुःखांना ही हसवायचे असते...

रोहिणी राकेश बजागे
जि. प. प्राथ केंद्रशाळा खडवली (प)

## प्यारा भाई

प्यारा प्यारा मेरा भाई,
जग से न्यारा मेरा भाई..
साथ हमेशा निभाता वो,
जैसे हो मेरी परछाई...
जितना वो लढता है मुझसे,
उतनाही प्यार जताता है..
चेहरे पर देखकर उलझन वो,
झट से दूर भगाता है...
मेरी ताकत, मेरी हिम्मत,
सच मे मेरी पहचान भाई..
मेरा साहस, मेरी दौलत,
मेरा हर अरमान भाई...
खुशियों की खान है भाई,
मेरा अरमान है भाई...

अजू नन्हे निषाद
जि. प. शाळा पिंपरी

## परीच्या दुनियेत

परी गं परी तू सुंदर परी ,
कधीतरी नेशील का तुझ्या घरी..?
घरी तुझ्या येईन,
दुनियेत तुझ्या फिरेन...
मैत्रिणींशी तुझ्या,
गप्पा मी मारेन...!
रूप तुझे सुंदर दिसते गं परी,
तुझ्यासारखं मला करशील का तरी..?
उडायला थोडं शिकवशील का ?
तुझ्या संग मला नेशील का ?
तुझ्यासारखी जादू करायला शिकवशील का?
तुझी दुनिया मला दाखवशील का ?
दुनियेत तुझ्या येऊन मला खूप छान वाटलं...
साज तुझा मला देशील का ?
घरी तुझ्याच ठेवून मला घेशील का ?



श्रावणी दांडेकर
जि प शाळा पिसवली

# मॅरेथॉन

स्पर्धा ठरली प्राण्यात,
गर्दी झाली जंगलात..
कासव करून उंच मान,
म्हणाले मी जिंकीन मॅरेथॉन..!
माकडाने मारली उडी,
मी तर जिंकीन उंच उडी..
मिठू मिठू बोले पोपट,
मॅरेथॉन मी जिंकीन पटपट..!
सोंड हलवीत आला हत्ती,
जिंकीन म्हणतो नामी कुस्ती..
बेडकाने मग खाल्ला भाव,
अंपायर मी डराव डराव..!

खार म्हणते मी सर्वात छोटी,
चपळाई मात्र सर्वात मोठी..
जिराफ म्हणे उंच माझी मान,
सर्वात उंच माझे स्थान..!
ससा उड्या मारतो पटपट,
गाजर खाण्यात सर्वात झटपट..
उद्घाटनाला आला वाघ,
सारीच झाली भागमभाग..!

प्राजक्ता तानाजी मिरकुटे
जि. प. शाळा दहिवली



# माझं पान

साठ-सत्तरच्या दशकात 'आजीचे घड्याळ' केशवकुमार (प्र.के.अत्रे), 'देवा तुझे किती सुंदर आकाश' आणि 'फुलावर फुलपाखरू छान किती दिसते' (ग.ह.पाटील) आणि कुसुमाग्रज यांची 'उठा उठा चिऊताई..' अशा अनेक कवितांनी बालमनाला भुरळ घातली होती. त्यातील साधे, सरळ, सोपे शब्द आणि गेयता व नादमधुरतेमुळे कविता हृदयात घर करून होत्या शिवाय या कवितांमुळे मराठी विषयाची प्रचंड गोडीही लागली !

माजी शिक्षण संचालक वि.वि चिपळूणकर एका भाषणात म्हणाले स्वातंत्र्यानंतर आपण शिक्षणात संख्यात्मक वाढ केली आता वेळ आलीय मात्र भाषेतल्या शिक्षणात गुणात्मक, मुल्यात्मक, शिक्षण पद्धतीची. डॉ. रुपाली खोमणे, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कल्याण यांच्या संकल्पनेतून 'क क कवितेचा' स्तुत्य उपक्रम म्हणजे सर्व सामान्य घरातील, मर्यादित संसाधन असणाऱ्या बालकांमधील सर्जनशीलतेचा शोध आहे आणि यातूनच उद्याचे वाचक, लेखक आणि कवी घडणार आहे. या अनोख्या उपक्रमाचं या क्षेत्रातील तज्ज्ञ स्वागत करतीलच पण अशा प्रतिभेच्या शोधाचे अनुकरण इतर शाळाही करतील आणि आपल्या भाषेला नवे आयाम देतील.

इंग्रजी माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे नवी पिढी मराठी पासून दूर जाते आहे असं वाटत असतांनाच अनेक नव्या -जुन्या कवींनी लहान मुलांसाठी बालकविता संग्रह काढले आणि मराठीशी आपली व नव्या पिढीची नाळ जोडण्याचा प्रयत्न होऊ लागलाय. 'क क कवितेचा' या संग्रहातील कविता म्हणजे प्रतिभेचा अद्भुत आविष्कार आहे. छोटी कवयित्री आपल्या शाळेतल्या गोष्टींच्या वाचनालयाला हिमालयाची उपमा देते. 'किती वाचले तरी न संपे हिमालय' म्हणते. मला वाटतं मोठी झाल्यावर जेव्हा शब्दांची पासोडी तिच्या हातात येईल तेव्हा ती 'न संपे' साठी 'न लंघे' असा शब्द प्रयोग करेल. आणि हे भाषेची गोडी लागल्यावर शक्य आहे. सर्वच कविता विलक्षण आहेत. डॉ.रुपाली खोमणे, सौ.वैशाली सावंत संपादन समिती आणि पंचायत समिती कल्याण यांचे मनापासून अभिनंदन आणि शुभेच्छा...!

- कवी राजीव जोशी

श्री. राजीव जोशी यांचे प्रकाशित साहित्य

१) ताजा कलम २) संकीर्तन

३) कानामात्रावेलांटी ४) शतकोत्तरी ओरखडा